लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०८८७००/२२०८८७००
Email : smallcausecourt@yahoo.com

# <u>जाहीर निविदा</u>

लघुवाद न्यायालय, धोबी तलाव, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ या न्यायालयाच्या आवारात असलेली आंबा व फणस यांची साधारण १०० वर्षा पूर्वीचे मोठे वृक्ष बृहन्मुंबई मार्फत तोडण्यांत आलेले आहेत. सदरच्या वृक्षांचे मोठ-मोठे ओंडके या न्यायालयाच्या आवारामध्ये ठेवण्यांत आलेले आहेत. सदरच्या ओंडक्यांची विक्री करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून/संस्थांकडून दिनांक ०१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत दुपारी ३.०० मोहोरबंद स्वरूपात निविदा मागविण्यात येत असून निविदेचा सविस्तर तपशील, अटी व शर्ती शासनाच्या http://www.bombayhighcourt.nic.in व http://ecourts.gov.in/mumbai/small-cause या संकेतस्थाळावर उपलब्ध आहेत.

sd/-

लघुवाद न्यायालय, }
}
मुंबई : २१ जुलै, २०१७ }

अप्पर प्रबंधक,
लघुवाद न्यायालय, मुंबई

लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२

## जाहीर निविदा

**आंबा व फणस या वृक्षांच्या ओंडक्यांची विक्री करणेबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| १. | निविदाधारकाने / संस्थेने निविदेसोबत ओंडक्यांची विक्री व खरेदी करण्याच्या शासनाकडून मिळालेल्या परवान्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. |
| २. | निविदाधारक या न्यायालयात निविदा सादर करण्यापुर्वी आंबा व फणसाचे उपलब्ध असलेले ओंडके या न्यायालयाची पुर्व परवानगी घेऊन, प्रत्यक्ष पाहणी करु शकतात. |
| ३. | निविदाधारकाने / संस्थेने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षाच्या साक्षांकित प्रत, सेवाकर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, पॅन कार्ड, इत्यादी कागदपत्रांच्या स्वाक्षांकित छायाप्रत देखील निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| ४. | नविदाधारकाने / संस्थेने निविदा विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"आंबा व फणसाचे ओंडके खरेदी करण्याबाबत निविदा"** असे लिहून त्या **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२"** यांच्याकडे दिनांक ०१ ऑगस्ट, २०१७ पर्यत दुपारी ३.०० वाजेपर्यत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या निविदा विचारात घेण्यांत येणार नाहीत. |
| ५. | निविदाधारकाची आंबा व फणसाचे ओंडके खरेदी करण्याची निविदा मंजूर झाल्यास निविदाधारकाने निवेदीतील रक्कम ओंडके घेऊन जाण्यापुर्वी **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई"** यांचे नांवे धनादेशाने/धनाकर्षाने या कार्यालयात आगाऊ जमा करणे बंधनकारक आहे. त्यानंतरच या न्यायालयामार्फत ओंडके घेऊन जाण्याची लेखी परवानगी निविदाधारकास देण्यांत येईल. |
| ६. | आंबा व फणसाचे ओंडके या न्यायालयातून वाहून नेताना, या न्यायालयाच्या आवारातील कोणत्याही स्थावर व जंगम मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची काळजी निविदाधारकाने घ्यावयाची आहे. जर कोणतेही नुकसान झाले तर त्याची तत्काळ भरपाई करण्याची जबाबदारी निविदाधारकावर असेल. |
| ७. | प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई यांना निविदा प्रक्रिया रद्द किंवा त्यामध्ये बदल करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्याबद्दल कोणतीही तक्रार वा आक्षेप स्विकारणे जाणार नाहीत. |

sd/-

लघुवाद न्यायालय, }
}
मुंबई : २१ जुलै, २०१७ }

अप्पर प्रबंधक,
लघुवाद न्यायालय, मुंबई